प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान (PMKUVA) या राज्यस्तरीय अभियानांतर्गत किमान ३००-१५०० चौ. फुट जागेमध्ये “महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र” सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: कौरोउ-२०२५/प्र.क्र.७२/कौशल्य-१**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक: ०६ एप्रिल, २०२६**

वाचा :-

१. कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शा. नि. क्र.: कौविउ-२०१५/प्र.क्र.११२/रोस्वरो-१, दि.०२.०९.२०१५,

२. कौ.रो.उ.व ना. वि., शा.नि. क्र. :कौविउ-२०२३/ प्र.क्र.१५७/कौशल्य-१,दि.१२.०९.२०२४,

३. कौ.रो.उ.व ना. वि., पत्र क्र. :कौविउ-२०२३/ प्र.क्र.१४१-भाग-२/कौशल्य-१,दि.१७.१०.२०२३,

४. सा. प्र. वि., शा. नि. क्र.: १७५३/प्र.क्र.३५८/ सात, दि. १३.०३.२०२६,

५. सा. न्या. व वि. स. वि., शा. नि. क्र: सा न्या वि -२०२५/प्र. क्र. २७/ बांधकामे, दि. ३०.०३.२०२६.

**प्रस्तावना:**

राज्यातील शहरी भागांत होत असलेल्या औद्योगिक प्रगतीमुळे रोजगारानिमित्त ग्रामीण व दुर्गम भागातून मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत आहे. यामुळे मुंबईसह इतर मेट्रो शहरांच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. या वाढत्या स्थलांतरित वर्गाला केवळ निवाराच नव्हे, तर शाश्वत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे शासनाच्या विकासात्मक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यासाठी शासन गृहनिर्माण, आरोग्य, शिक्षण आणि औद्योगिक क्षेत्रात विविध यशस्वी उपक्रम राबवत आहे. विशेषतः आरोग्य, आदरातिथ्य, पर्यटन आणि अन्नप्रक्रिया यांसारख्या क्षेत्रांत कौशल्याभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. कौशल्य सक्षमीकरणामुळे स्थलांतरित नागरिकांना सन्मानाचा रोजगार मिळून त्यांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांना मुख्य अर्थव्यवस्थेत सामावून घेणे शक्य होत आहे.

२. तसेच, दुर्गम भागातील नागरिकांना देखील त्यांच्या परिसरातील स्थानिक संसाधनांवर (खनिज, वन, जल, शेती) आधारित कौशल्य प्रशिक्षण दिल्यास त्यांना स्थानिक पातळीवरच रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांचे स्थलांतर थांबण्यास मदत होईल आणि त्यांना राज्याच्या आर्थिक प्रवाहात सामील करून घेतल्याने विकासाचा समतोल साधला जाईल. उपरोक्त कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना असे निदर्शनास आले की, शहरी व दुर्गम भागांत कौशल्य केंद्र सुरू करण्यासाठी सध्याच्या विहित मानकानुसार (१५०० चौ.फू.) जागा उपलब्ध होण्यास समस्या येत आहेत. परिणामी, अनेक गरजू उमेदवार प्रशिक्षणापासून वंचित राहत असल्याने राज्यातील झोपडपट्टी, दुर्गम डोंगराळ, डोंगरी,नक्षलग्रस्त, आदिवासी भागातील गरजू युवा वर्गासाठी विहित कौशल्य केंद्राच्या जागेच्या परिमाणामध्ये शिथिलता आणून किमान ३०० ते १५०० चौ. फूट जागेमध्ये कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यास मान्यता मान्यता देण्याची तसेच सन २०२६ हे वर्ष क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे 'द्विशताब्दी वर्ष' म्हणून साजरे होत असल्याने या ऐतिहासिक वर्षाचे औचित्य साधून, उपरोक्त कौशल्य विकास केंद्रांना "महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र" नाव देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील सर्व झोपडपट्टी, दुर्गम डोंगराळ, डोंगरी, नक्षलग्रस्त आणि आदिवासी भागातील गरजू युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सध्याच्या जागेची मानके शिथिल करुन प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानांतर्गत (PMKUVA) किमान ३०० ते १५०० चौ. फूट जागेत कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. तसेच, संदर्भाधीन क्र.०५ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. ३० मार्च, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सन २०२६ हे वर्ष क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे 'द्विशताब्दी वर्ष' म्हणून साजरे करण्यात येत आहे. या ऐतिहासिक प्रसंगाचे औचित्य साधून महात्मा फुले यांच्या व्यावसायिक शिक्षणाच्या संकल्पनेनुसार आधूनिक बाजारपेठेची गरज ओळखून युवकांना कौशल्यबद्ध करणे आणि त्यांना सन्मानाचा रोजगार मिळवून देऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी या योजनेअंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या सर्व कौशल्य विकास केंद्रांना “महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र” असे नाव देण्यात येत आहे.

३. **“महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केद्रांची व्याप्ती, स्वरुप, मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे:-**

१. सदर कौशल्य विकास केंद्रांच्या जागेच्या निकषातील ही शिथिलता केवळ खालील नमूद क्षेत्रांना लागू राहिल.

- घोषित झोपडपट्टी क्षेत्र.
- नियोजन विभागाने निश्चित केलेले डोंगरी क्षेत्र (शा.नि. दि. १७.०७.२०२५)
- राज्य शासनाने 'Hardship Allowance' लागू केलेले भाग.
- गृह विभागाने घोषित केलेले नक्षलग्रस्त भाग (शा.नि. दि. २७.०६.२०२५)
- आदिवासी विकास विभागाने घोषित केलेले आदिवासी क्षेत्र
- प्रत्येक ग्रामीण क्षेत्रातील गावठाण भाग
- आकांक्षित जिल्हे व तालुके

उपरोक्त नमूद क्षेत्रांना प्राथम्य देण्यात यावे. राज्यात प्रथमत: सर्व ठिकाणी कमाल १०० केंद्रांना मान्यता देण्यात येत आहे. सदर केंद्रांचे मुद्दा. ०७ मध्ये नमूद समितीमार्फत ३ महिन्यांनंतर प्रत्यक्ष रोजगार अथवा स्वयंरोजगार संधींचे मूल्यांकन करून ही केंद्रे सुरू ठेवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

२. सदर कौशल्य विकास केंद्रांच्याबाबत सर्वसाधारण सूचना पुढीलप्रमाणे राहतील.

- उपरोक्त नमूद क्षेत्रामध्ये जर SIDH पोर्टलवर सूचीबद्धतेसाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध असेल तर अशा ठिकाणी ३०० चौ.फु. जागेमध्ये कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता देवू नये. जर SIDH पोर्टलवर सूचीबद्धतेसाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध नसेल तरच ३०० चौ.फु. जागेमध्ये कौशल्य केंद्र सुरु करण्यास मान्यता देणेबाबत विचार करण्यात यावा. त्यासंबंधित सहा.आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (DVETO) यांनी प्रमाणित करावे.
- प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी प्रस्तावित शिथिलता देण्यात येणाऱ्या सर्व प्रशिक्षण केंद्रांची तपासणी सहा.आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी करणे आवश्यक आहे.
- सदर शिथिलता प्रदान करण्यात आलेल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षित करावयाचे उमेदवार हे उपरोक्त नमूद ठराविक क्षेत्रातीलच रहिवासी असणे बंधनकारक राहील.

## ३. सदर कौशल्य विकास केंद्रांसाठी प्रमाणित कार्यपद्धती : (Standard Operating Procedure - SOP) :-

३.१ अर्ज आणि सूचीबद्धता (Application & Affiliation)

- इच्छुक प्रशिक्षण संस्थेने MSBSVET च्या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा.
- जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक आयुक्त आणि DVETO अधिकारी जागेची झोपडपट्टी/दुर्गम डोंगराळ/ नक्षलग्रस्त/आदिवासी व ज्या भागामध्ये माध्यमिक शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था अस्तित्वात नाहीत याची पायाभूत सुविधांची तपासणी करुन अहवाल तयार करतील.
- तपासणी अहवालाच्या आधारे MSBSVET कडून केंद्राला सूचीबद्धता (Affiliation) प्रदान केली जाईल.

३.२ उमेदवार नोंदणी (Mobilization):-

- केवळ संबंधित क्षेत्रातील रहिवासी असलेल्या उमेदवारांनाच या प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश देता येईल.
- यासाठी स्थानिक बचत गट (SHG) किंवा सामाजिक संस्थांची (NGO) मदत घेता येईल पण यासाठी कोणतेही वेगळे शुल्क अदा केले जाणार नाही.

३.३ हजेरी व प्रशिक्षण (Training & Attendance)

- केंद्राने महास्वयंम पोर्टलवर तुकडी (Batch) तयार करुन प्रशिक्षणार्थींची माहिती अचूक भरावी.
- प्रशिक्षणासाठी Iris Based AEBAS हजेरी प्रणाली वापरणे बंधनकारक राहिल.
- केंद्राकडे TOT प्रमाणित प्रशिक्षक असणे आवश्यक आहे.

३.४ मूल्यमापन आणि प्रमाणपत्र (Assessment)

- प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर MSBSVET मार्फत मूल्यमापन परीक्षा घेण्यात येईल.
- पूर्ण प्रशिक्षणांती उत्तीर्ण उमेदवारांना MSBSVET मार्फत अधिकृत प्रमाणपत्र प्रदान केले जाईल.

## ४. कौशल्य केंद्र जागेचे निकष व पायाभूत सुविधा:-

४.१ किमान क्षेत्र:- प्रशिक्षण केंद्रासाठी किमान ३०० चौ. फूट जागा असणे आवश्यक आहे. सदरची जागा येण्याजाण्यास सोयीस्कर असावी. किमान ३०० चौ. फूट जागेपैकी २४० चौ. फूट 'Hybrid Training Room' साठी असावी व आवश्यकतेनुसार उपकरणे, साधनसामग्री उपलब्ध असावी. उर्वरित ६० चौ. फूट जागा स्वागत/चौकशी व समुपदेशन कक्षासाठी वापरता येईल. (३०० चौ.फु. पेक्षा जास्त जागा असल्यास सप्रमाणात कार्यवाही करावी.)

४.२ कौशल्य केंद्राची ही संस्थेच्या स्वमालकीची असावी. नसल्यास किमान ३ वर्षे रितसर भाडेकरार केलेला असावा.

४.३ कौशल्य केंद्राची इमारत मजबूत व सुरक्षित असावी. ग्रामीण भागात भौगोलिक परिस्थितीनुसार (उदा. कोकण) कौलारू छप्पर असल्यास हरकत नाही.

४.४ कौशल्य केंद्राच्या सुरक्षेसाठी 'अग्निशमन उपकरण' (Fire Extinguisher) अनिवार्य आहे.

४.५ सदर प्रशिक्षण केंद्रांमध्ये CCTV / AI enabled IP कॅमेरा असणे आवश्यक असून आवश्यकतेनुसार त्याचे Access जिल्हा कार्यालयाला / MSSDS देखरेख कक्षाला देण्यात यावे. सीसीटीव्हीचा डेटा ९० दिवस जतन (Data Retention) करावा.

४.६ कौशल्य विकास केंद्रासाठी हवेशीर खोली, आवश्यकतेनुसार फर्निचर, इंटरनेट, पिण्याचे पाणी, आणि स्वच्छ प्रसाधनगृहे असणे अनिवार्य आहे. इमारतीत स्वतंत्र स्वच्छतागृह असावे. नसल्यास केंद्र परिसरात स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह ग्राहय धरण्यात येईल. सदरचे प्रसाधनगृह स्वच्छ नीटनेटके व जाण्यायेण्यास सुलभ असावे.

४.७ कौशल्य केंद्रातील वातावरण दिव्यांग स्नेही व सुरक्षित असावे.

४.८ प्रशिक्षणार्थींना कौशल्य अभ्यासक्रमास अनुसरुन अद्ययावत प्रयोगशाळा असावी. नसल्यास नजिकच्या परिसरात प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिकावर आधारीत प्रशिक्षण देण्याची सुविधा असावी.

४.९ सदर केंद्राच्या बाहेर फलकावर **'महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र'** हे नाव मोठ्या आणि ठळक अक्षरात असावे. तसेच MSBSVET संलग्नतेचा बोर्ड, अभ्यासक्रमाची माहिती आणि विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाइन क्रमांक लिहावा.

**५. प्रशिक्षक, प्रशिक्षण व प्रशिक्षणार्थी संख्या :-**

५.१ अभ्यासक्रम :- प्रशिक्षण केंद्राच्या जागेची ही शिथिलता केवळ “परिशिष्ट ४” मध्ये नमूद केलेल्या निवडक सूचक अभ्यासक्रमांसाठीच लागू असेल.

५.२ क्षमता :- हे केंद्र किमान ३०० चौ.फु जागेत चालविण्यात येतील. तसेच, ३०० -१५०० चौ.फु. जागा असल्यास त्याप्रमाणात अतिरिक्त प्रशिक्षणार्थी मंजूर करण्यात येतील. (प्रत्येक तुकडीमध्ये कमाल ३० प्रशिक्षणार्थी )

५.३ विद्यार्थी संख्या :- प्रत्येक केंद्रावर ९० विद्यार्थी किंवा प्रत्येक ३० प्रशिक्षणार्थी यांच्या कमाल ०३ तुकड्या असतील. एका दिवसात ०३ वेगवेगळया सत्रात तीन प्रशिक्षण तुकडया राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५.४ प्रशिक्षक :- संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण तुकडीचे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी प्रशिक्षण केंद्राकडे ToT प्रमाणित प्रशिक्षक तसेच अनुभवी, विषयाचे सखोल ज्ञान असणारे, मार्केटचे ज्ञान असणारी, संबंधित क्षेत्रातील प्रमाणित तांत्रिक कौशल्य प्राप्त असणारी, उत्तम संवाद व भाषा कौशल्य असलेले प्रशिक्षक असावेत.

**६. इतर निकषः-**

६.१ रहिवासी अटः- प्रशिक्षित होणारे उमेदवार संबंधित क्षेत्रातीलच रहिवासी असणे बंधनकारक आहे.

६.२ हजेरी :- Iris based AEBAS हजेरी प्रणाली बंधनकारक असेल. तसेच, हजेरी प्रणालीबाबत MSSDS अथवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेली हजेरी प्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक असेल.

६.३ तपासणी :- १००% केंद्रांची प्रत्यक्ष तपासणी सहा.आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी करावी व याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षण केंद्रास मान्यता देण्यात यावी.

६.४ प्रशिक्षण साहित्य :- संबंधित NSQF सुसंगत अभ्यासक्रमासाठी निश्चित करण्यात आलेल्या मानकांनुसार Equipment असणे आवश्यक आहे.

६.५ संलग्नता :- महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ (MSBSVET) मार्फत ऑनलाइन अर्जाद्वारे ही संलग्नता प्रदान करण्यात यावी.

६.६ प्रमाणित प्रशिक्षणार्थींना रोजगारासाठी प्रत्येक केंद्राने स्थानिक उद्योग /MSME/खाजगी आस्थापना (Industry) इ.सोबत सामंजस्य करार (MoU) करणे बंधनकारक राहिल ज्यायोगे किमान ६० टक्के प्रशिक्षणार्थींना किमान ०३ महिन्यांकरिता रोजगार उपलब्ध होईल.

६.७ उपरोक्त प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या नियामक समितीच्या कार्योतर मान्यतेस अधीन राहून प्रशिक्षण केंद्र चालू करण्यास येईल. प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (PMKUVA) या अंतर्गत चालविण्यात यावी.

६.८ प्रशिक्षण संस्थेने निवड केलेला अभ्यासक्रम हा जिल्हा कौशल्य विकास आराखड्यामध्ये समाविष्ट असावा.

६.९ सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. १७५३/प्र.क्र.३५८/ सात, दि. १३.०३.२०२६ अन्वये महाराष्ट्र शासनाद्वारे नॉन-आयटी संस्थांच्या सल्लागार संस्थांची सूची तयार करण्यात आलेली आहे. या शासन निर्णयात नमूद संस्थांद्वारे वरील कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात यावेत.

७. सदर कौशल्य विकास केंद्राच्या प्रभावी व पारदर्शक अंमलबजावणी करिता आयुक्त, कौशल्य विकास यांच्या अध्यक्षतेखाली एक संचालन समिती नियुक्त करण्यात येत असून या समितीमध्ये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, संचालक, महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र कौशल्य विकास सोसायटी आणि दोन अशासकीय सदस्य (तांत्रिक विशेषज्ञ) हे सदस्य राहतील. सदर समिती केंद्र मंजूर करणे, अभ्यासक्रम निकषांप्रमाणे चालत आहे याची देखरेख करणे यासाठी आवश्यक कार्यवाही करेल. व याबाबतचा तिमाही अहवाल शासनास सादर करेल.

८. सदर केंद्र चालविणाऱ्या संस्थांना केंद्र व राज्य शासनाच्या नियमानुसार इतर कौशल्य विषयक योजनांचा लाभ घेण्याची मुभा राहील.

९. 'महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र' सुरू करण्यासाठी किमान ३०० ते १५०० चौ. फूट जागेच्या निकषात देण्यात आलेल्या शिथिलतेव्यतिरिक्त इतर सर्व अटी, तरतुदी व मार्गदर्शक सूचना यापूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांनुसार राहतील.

१०. "महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र" सुरू करण्यासाठी अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी, संस्थेने अर्जासोबतच्या स्वयंघोषणापत्राचा नमुना व सूचक अभ्यासक्रम या शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट -१, परिशिष्ट-२, परिशिष्ट -३ व परिशिष्ट -४ प्रमाणे राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४०६१८५७३९९६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.04.07 17:44:20 +05'30'

**(वैशाली सुळे)**
**उपसचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य ) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
२. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२,
३. मा.विरोधीपक्ष नेता विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव विधानभवन, मुंबई,
४. सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य,
५. मा.मुख्य सचिव, (महाराष्ट्र राज्य),मंत्रालय, मुंबई -३२,
६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अ.मु.स./प्र.स./सचिव मंत्रालय, मुंबई-३२,
७. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था,/महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मुंबई,
९. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,

१०. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता) ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, महाराष्ट्र, नागपूर,

११. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई, निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,

१२. संचालक , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१३. संचालक (शिक्षण ), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,मुंबई,

१४. उपायुक्त, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई /पुणे /नागपूर/ अमरावती/ औरंगाबाद /नाशिक,

१५. विभागीय सहसंचालक/ उप संचालक, व्य.शि. व प्र.संचा. मुंबई/पुणे/ नागपूर/ अमरावती/औरंगाबाद/ नाशिक विभाग,

१६. सर्व कार्यासने, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,मंत्रालय, मुंबई,

१७. निवड नस्ती/कौशल्य -१

## परिशिष्ट-१

### अर्जाचा नमुना : (Application Format for Training Centre)

इच्छुक प्रशिक्षण संस्थेने MSBSVET पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतांना खालील माहिती भरणे आवश्यक आहे.

- संस्थेचा तपशील :- संस्थेचे नाव, नोंदणी क्रमांक व पत्ता.
- प्रशिक्षण केंद्राचे स्थान :- झोपडपट्टी/दुर्गम/डोंगराळ/नक्षलग्रस्त/आदिवासी/Hardship allowance अशा क्षेत्रात असल्याबाबतचा पुरावा.
- जागेचा तपशील :- ३०० चौ.फु. क्षेत्राचा नकाशा (ज्यामध्ये २४० चौ.फु. हायब्रिड क्लासरुम ६० चौ.फु. चौकशी कक्ष व इतर सुविधा दर्शविल्या असतील.)
- पायाभूत सुविधा :- इमारतीचा प्रकार (RCC किंवा सुरक्षित छप्पर सुरक्षित छप्पर) वीज आणि इंटरनेट सुविधा CCTV, प्रोजेक्टर प्रोजेक्टर,स्मार्ट टिव्ही आणि स्वतंत्र/प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीच्या आवारात स्वच्छतागृह व प्रसाधगृहाची उपलब्धता असावी.
- प्रशिक्षक माहिती: संबंधित अभ्यासक्रमासाठी उपलब्ध असलेल्या TOT (Training of Trainers) प्रमाणित प्रशिक्षकांचे नाव व पात्रता.
- उपकरणे: निवडलेल्या NSQF सुसंगत अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेले साहित्य आणि मशिनरी.
- अर्जाची छाननी आणि प्रत्यक्ष पडताळणी खालील प्राधिकरणांमार्फत केली जाईल:

| अधिकारी / कार्यालय | जबाबदारी |
|---|---|
| सहा. आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र | केंद्राच्या ठिकाणाची (Location) पडताळणी करणे आणि बॅचला मान्यता देणे. |
| जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी DVETO) | पायाभूत सुविधा, वर्गखोली, प्रयोगशाळा आणि साहित्याची तांत्रिक तपासणी करणे. |
| क्षेत्रीय अधिकारी (Field Officers) | १००% प्रशिक्षण केंद्रांची प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी अहवाल सादर करणे. |

"NCVET (National Council for Vocational Education and Training) कडून अभ्यासक्रमाच्या कालावधीत (Course Duration) वेळोवेळी जे बदल किंवा सुधारणा केल्या जातील, त्या या प्रशिक्षण केंद्रांना आपोआप लागू राहतील.

टीप :

१. परिशिष्ट -४ अभ्यासक्रमांची यादी सूचक असून यामध्ये आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम समाविष्ट करणे अथवा वगळणे याबाबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या नियामक समितीची मान्यता घेणे आवश्यक राहिल.

२. ज्या अभ्यासक्रमांसाठी मोठया प्रमाणात यंत्रसामग्री व Phase-३ विद्युतभाराची आवश्यकता आहे अशा अभ्यासक्रमाचा विचार करण्यात येवू नये.

३. प्रस्तावित प्रशिक्षण केंद्रामध्ये मान्यता प्रदान करावयाच्या अभ्यासक्रमांची NSQF Level ३ पेक्षा जास्त नसावी.

४. संबंधित प्रशिक्षण केंद्राने प्रात्यक्षिकासाठी नजिकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था/अभियांत्रिकी महाविद्यालय/ पॉलिटेक्निक/इतर महाविद्यालये/Industry ज्यांच्याकडे प्रात्यक्षिकासाठी आवश्यक सुविधा आहेत अशांसमवेत सामंजस्य करार करुन टायअप करावे . On Job Training Industry करीता

Industry समवेत सामंजस्य करार करुन tie up अशा प्रकारचा सामंजस्य करार करणे संबंधित प्रशिक्षण संस्थेसाठी अनिवार्य करणे बंधन

५. ज्यांच्याकडे प्रात्यक्षिकसाठी आवश्यक सुविधा आहेत समवेत सामंजस्य करार करून tie up करावे. तसेच, करिता समवेत सामंजस्य करार करून करावे. अशा प्रकारचा सामंजस्य करार (MoU) करणे संबंधित प्रशिक्षण संस्थेसाठी अनिवार्य असून सूचीबद्धतेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. सामंजस्य कराराचा प्रारूप मसुदा सोबत जोडण्यात आला आहे.

६. प्रशिक्षण कार्यक्रम गुणवत्तापूर्ण होण्यासाठी ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रती विद्यार्थी १ मशीन (उदा. संगणक, शिलाई मशीन इ.) आवश्यक आहे, अशा ठिकाणी आवश्यक उपकरणे उपलब्ध असल्याची तपासणीदरम्यान खात्री करण्यात यावी.

******

## परिशिष्ट-२

**PMKUVA अंतर्गत ३००-१५०० चौ. फुट जागेत कौशल्य केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे (Checklist)**

**१. केंद्राच्या जागेचा पुरावा (Space & Location Documents)**

- क्षेत्रफळ नकाशा: -केंद्राची एकूण जागा ३०० ते १५०० चौ. फूट असल्याचे दर्शवणारा नकाशा (Layout Plan).
- हायब्रिड क्लासरूम तपशील:- २४० चौ. फूट जागा प्रशिक्षणासाठी आणि ६० चौ. फूट जागा रिसेप्शन/ समुपदेशनासाठी असल्याचे रेखाचित्र.
- क्षेत्राचा दाखला:-केंद्र परिशिष्ट १ नुसार घोषित झोपडपट्टी, डोंगरी, नक्षलग्रस्त किंवा Hardship allowance लागू असलेल्या भागात असल्याचा अधिकृत दाखला.
- इमारत सुरक्षितता:-इमारत RCC असल्याची खात्री किंवा ग्रामीण भागात सुरक्षित छप्पर (उदा. कौलारू) असल्याचा पुरावा.

**२. पायाभूत सुविधा आणि उपकरणे (Infrastructure Checklist)**

- स्वच्छतागृह :-इमारतीत स्वतंत्र किंवा सामाईक स्वच्छतागृह उपलब्ध असल्याचा पुरावा/फोटो.
- हजेरी प्रणाली:-'Iris based AEBAS' हजेरी यंत्रणा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र.
- प्रशिक्षण साहित्य:- निवडलेल्या NSQF अभ्यासक्रमासाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री आणि उपकरणांची (Equipment) यादी.
- इंटरनेट जोडणी:- ऑनलाईन हजेरी आणि प्रशिक्षणासाठी आवश्यक इंटरनेट सुविधेचा तपशील.

**३. प्रशिक्षक आणि अभ्यासक्रम (Trainer & Course Documents)**

- TOT प्रमाणपत्र: संबंधित अभ्यासक्रमासाठी प्रशिक्षकाचे 'Train the Trainer' (TOT) प्रमाणित प्रमाणपत्र.
- अभ्यासक्रम निवड: परिशिष्ट ३ मधील निवडक सूचक अभ्यासक्रमाची माहिती.
- टीप: एका केंद्रात केवळ एकाच अभ्यासक्रमासाठी मान्यता दिली जाईल.

**४. अर्ज प्रक्रिया आणि नोंदणी (Registration & Process)**

- ऑनलाइन अर्ज प्रत: MSBSVET च्या पोर्टलवर (https://msbsvet.edu.in) केलेल्या अर्जाची प्रत.
- संलग्नता आदेश (Affiliation Order): MSBSVET कडून प्राप्त झालेला अधिकृत संलग्नता आदेश.
- कार्यादेश (Work Order): संबंधित योजनेअंतर्गत प्राप्त झालेला कार्यादेश.

******

## परिशिष्ट-३

### स्वयं-घोषणापत्र (Self-Declaration)

मी, **[तुमचे नाव]**, पदः **[तुमचे पद]**, **[संस्थेचे नाव]**, याद्वारे खालीलप्रमाणे सत्यता घोषित करतो/करते की:

१. आमच्या संस्थेने 'प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान' (PMKUVA) अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले कौशल्य प्रशिक्षण केंद्र (MJPKPK) स्थापन करण्यासाठी अर्ज केला आहे.

२. सदर प्रशिक्षण केंद्र हे शासन निर्णयातील परिशिष्ट १ नुसार घोषित **झोपडपट्टी /दुर्गम/ डोंगरी / नक्षलग्रस्त /आदिवासी/ /आकांक्षित जिल्हा** /Hardship Allowance लागू असलेल्या क्षेत्रात स्थित आहे.

३. सदर केंद्राचे एकूण क्षेत्रफळ **३०० ते १५०० चौ. फूट** असून त्यामध्ये २४० चौ. फूट 'Hybrid Training Room' आणि उर्वरित जागेत रिसेप्शन व समुपदेशन कक्ष उपलब्ध आहे.

४. सदर केंद्रात प्रशिक्षणार्थींची कमाल संख्या **३०** इतकी मर्यादित ठेवली जाईल.

५. केंद्रात प्रशिक्षणासाठी Iris Based AEBAS हजेरी प्रणाली बसविण्यात आली असून ती अनिवार्यपणे वापरली जाईल.

६. इमारतीमध्ये किंवा केंद्र परिसरात महिला व पुरुषांसाठी **स्वतंत्र/सामाईक स्वच्छतागृहाची** सुविधा उपलब्ध आहे.

७. प्रशिक्षण केंद्राची इमारत सुरक्षित असून ती RCC / **कौलारू / छप्पर** स्वरूपाची आहे.

८. सदर केंद्रात केवळ परिशिष्ट ३ मध्ये नमूद केलेल्या **[अभ्यासक्रमाचे नाव]** या सूचक अभ्यासक्रमाचेच प्रशिक्षण दिले जाईल.

९. केंद्रात प्रवेश घेणारे सर्व उमेदवार हे संबंधित क्षेत्रातीलच **रहिवासी** असतील याची खातरजमा करण्यात येईल.

वरील सर्व माहिती सत्य असून त्यामध्ये कोणतीही तफावत आढळल्यास आमची सूचीबद्धता (Affiliation) रद्द करण्यास आमची संमती असेल.

**ठिकाण:** _______________

**दिनांक:** _______________

**(अर्जदाराची स्वाक्षरी व शिक्का)**

******

## परिशिष्ट – ४

**सूचक अभ्यासक्रम** (Indicative Courses)

किमान ३०० चौ. फुटांच्या मर्यादित जागेत खालील क्षेत्रांतील निवडक अभ्यासक्रम राबवण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रत्येक तुकडीची कमाल विद्यार्थी संख्या ३० इतकी राहिल.

| Sr. No. | Course Code | Course Name | Sector | Duration (hour) | NSQF |
|---|---|---|---|---|---|
| 1 | AMH/Q0301 | SEWING MACHINE OPERATOR | APPAREL MADE-UPS AND HOME FURNISHING | 300 | 2.5 |
| 2 | AMH/Q0305 | SEWING MACHINE OPERATOR - KNITS | APPAREL MADE-UPS AND HOME FURNISHING | 300 | 2.5 |
| 3 | AMH/Q1001 | HAND EMBROIDERER (ADDAWALA) | APPAREL MADE-UPS AND HOME FURNISHING | 270 | 2 |
| 4 | AMH/Q1947 | SELF EMPLOYED TAILOR | APPAREL MADE-UPS AND HOME FURNISHING | 300 | 2.5 |
| 5 | BSC/Q2401 | MICROFINANCE EXECUTIVE | BANKING, FINANCIAL SERVICES AND INSURANCE | 420 | 3 |
| 6 | BSC/Q3801 | INSURANCE AGENT | BANKING, FINANCIAL SERVICES AND INSURANCE | 420 | 3 |
| 7 | BSC/Q3802 | MUTUAL FUND DISTRIBUTOR | BANKING, FINANCIAL SERVICES AND INSURANCE | 420 | 3 |
| 8 | BWS/N0235 | ASSISTANT HAIRDRESSER | BEAUTY AND WELLNESS | 40 | 2.5 |
| 9 | BWS/N0801 | FOUNDATION COURSE IN WELLNESS NUTRITION | BEAUTY AND WELLNESS | 30 | 2.5 |
| 10 | BWS/Q0101 | ASSISTANT BEAUTY THERAPIST | BEAUTY AND WELLNESS | 450 | 3 |
| 11 | BWS/Q0201 | ASSISTANT HAIR DRESSER AND STYLIST | BEAUTY AND WELLNESS | 390 | 3 |
| 12 | DWC/Q0102 | GENERAL HOUSEKEEPER | DOMESTIC WORKERS | 200 | 3 |
| 13 | DWC/Q0201 | CHILD CARETAKER | DOMESTIC WORKERS | 360 | 3 |
| 14 | DWC/Q0202 | BABY CAREGIVER (NON-CLINICAL) | DOMESTIC WORKERS | 360 | 3 |
| 15 | DWC/Q0203 | CAREGIVER - MOTHER AND NEW BORN (NON-CLINICAL) | DOMESTIC WORKERS | 400 | 3 |
| 16 | DWC/Q0801 | ELDERLY CARETAKER (NON-CLINICAL) | DOMESTIC WORKERS | 360 | 3 |
| 17 | G&J/Q0701 | JEWELLERY POLISHER AND CLEANER | GEM AND JEWELLERY | 450 | 3 |
| 18 | G&J/Q6802 | JEWELLERY RETAIL SALES ASSOCIATE | GEM AND JEWELLERY | 360 | 3 |
| 19 | G&J/Q9101 | PAYAL MAKER | GEM AND JEWELLERY | 450 | 3 |

| Sr. No. | Course Code | Course Name | Sector | Duration (hour) | NSQF |
|---|---|---|---|---|---|
| 20 | G&J/Q9202 | TARAKASI JEWELLER | GEM AND JEWELLERY | 450 | 3 |
| 21 | HAR/SD-1/CCDM | DIGITAL MARKETING ASSISTANT | IT-ITES | 300 | 3 |
| 22 | HCS/Q0804 | LEATHER TOY MAKER | HANDICRAFTS AND CARPET | 390 | 3 |
| 23 | HCS/Q0805 | TRADITIONAL PAINTING MAKER - ARTISAN | HANDICRAFTS AND CARPET | 390 | 3 |
| 24 | HCS/Q0806 | ASSISTANT LEATHER TOY MAKER - ARTISAN | HANDICRAFTS AND CARPET | 420 | 2.5 |
| 25 | HCS/Q7308 | TRADITIONAL SOFT TOY MAKER - ARTISAN | HANDICRAFTS AND CARPET | 390 | 2.5 |
| 26 | LSC/Q1001 | LAND TRANSPORTATION - ASSOCIATE | LOGISTICS | 510 | 3 |
| 27 | LSC/Q2603 | E--COMMERCE DELIVERY ASSOCIATE | LOGISTICS | 540 | 3 |
| 28 | MEP/Q0202 | OFFICE ASSISTANT | MANAGEMENT, ENTREPRENEURSHIP AND PROFESSIONAL | 330 | 3 |
| 29 | MEP/Q0204 | RECEPTIONIST | MANAGEMENT, ENTREPRENEURSHIP AND PROFESSIONAL | 420 | 3 |
| 30 | MEP/Q0301 | CLIENT ENGAGEMENT ASSOCIATE | MANAGEMENT, ENTREPRENEURSHIP AND PROFESSIONAL | 330 | 3 |
| 31 | NARQ40001 | ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT PROGRAMME (EDP) FOR MICRO ENTREPRENEURS | MANAGEMENT, ENTREPRENEURSHIP AND PROFESSIONAL | 108 | NA |
| 32 | NIE/SSC/Q0904 | CYBER SECURITY ASSISTANT | IT-ITES | 300 | 3 |
| 33 | NIE/SSC/Q1003 | ARTIFICIAL INTELLIGENCE ASSISTANT | IT-ITES | 300 | 3 |
| 34 | RAS/Q0101 | RETAIL STORE OPERATIONS ASSISTANT | RETAIL | 330 | 2 |
| 35 | RAS/Q0102 | RETAIL CASHIER | RETAIL | 360 | 3 |
| 36 | SSC/Q0110 | IT HELPDESK ATTENDANT | IT-ITES | 360 | 3 |
| 37 | SSC/Q2212 | DIGITAL MITRA | IT-ITES | 270 | 3 |
| 38 | SSC/Q2217 | IT CUSTOMER CARE EXECUTIVE | IT-ITES | 330 | 3 |

******